नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०३/२०२६ (मंगळवार )**

# अवघ्या ४ तासात टँकर चोरीचा गुन्हा उघड
# २५ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त
# वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक २३/०३/२०२६ रोजी फिर्यादी अंशुमनकुमार सुरेश तिवारी, वय २८ वर्ष, रा. अमरावती रोड, कमलावाडी नागपूर यांनी पोलीस स्टेशन वडोदा येथे तक्रार दिली की, फिर्यादीचे एस एस बिल्ड कॉम या सिमेंट प्लांट वरील टँकर क्रमांक एम एच ३१ सी क्यु ७३५३ हे वाहन दिनांक २२/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०५ वाजेच्या सुमारास प्लांट वरती दिवसभर काम करून सायंकाळी पार्क करून ठेवलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने टँकर चोरून नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए.पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन वडोदा येथील गुन्हे शोध पथकाने सदर गुन्हयाचा तात्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपीचा शोध घेत असता दिनांक २३/०३/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यात **आरोपी नामे तीलोचन बल्लूराम कुमार, वय ३० वर्ष, रा. मरार टोला, तालुका चिलाटी, जि. राजनंदनगाव, राज्य छत्तीसगड** याचा सहभाग असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपीचा कसुन शोध घेऊन त्यास इतवारी, नागपुर येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्याने पोलीस स्टेशन वडोदा परिसरातून टॅकर क्रं एम एच ३१ सी क्यु ७३५३ चोरी केल्याचे

कबुल केले. **वडोदा पोलसांनी जलद गतीने तपास करून अवघ्या ४ तसात सदर चोरीचा गुन्हा उघड केला आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयातील टॅंकर क्रमांक एम एच ३१/सी क्यु ७३५३ किंमती २५,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पुढील तपास वडोदा पोलीस करीत आहेत.**




## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक २३/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू असा एकुण ३४००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे रोशनलाल रामराज पडवार, वय २६ वर्ष, रा. डोंगरताल, ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे चंद्रकांत तेजराम रहिले, वय ५४ वर्ष, रा. कोथुळना, ता. सावनेर जि. नागपुर याचेवर

०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा एकुण ०३ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०३ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण ३४ लिटर मोहाफुल गावठी दारू असा एकुण ३४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७४३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे ११ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ८६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण २०२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मध्ये एकुण ७४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने